RNI No. MAHBIL /2009/40124

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग पाच

वर्ष ११, अंक २५(९)] शुक्रवार, डिसेंबर १२, २०२५/अग्रहायण २१, शके १९४७ [पृष्ठे १३, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक १२१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

---

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

महाराष्ट्र विधानसभेत दिनांक **१२ डिसेंबर, २०२५** रोजी पुरःस्थापित करण्यात आलेले खालील विधेयक महाराष्ट्र विधानसभा नियम ११६ अन्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**L. A. BILL No. XCI OF 2025.**

*A BILL*
*TO PROVIDE FOR THE MAHARASHTRA EMPLOYEE PARENT RESPONSIBILITY AND NORMS FOR ACCOUNTABILITY AND MONITORING.*

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९१.**

**महाराष्ट्र राज्यातील कर्मचाऱ्यांची मातापित्यांप्रती जबाबदारी, उत्तरदायित्व तसेच देखभाल यासंदर्भातील मानकांबाबत तरतूद करण्यासाठी विधेयक.**

**ज्याअर्थी,** आपल्या मातापित्याचा आदर करणे आणि त्यांची सेवा करणे हे प्रत्येक मुलाचे मुलभूत कर्तव्य आहे आणि तो युगानूयुगे भारतीय कुटूंब व्यवस्थेचा एक अविभाज्य भाग राहिलेला आहे आणि मुख्यतः राज्यातील बहुसंख्य कुटूंबांमध्ये त्याचे पालन केले जाते; आणि

ज्याअर्थी, निवृत्तिवेतनास आणि कुटूंब वेतनास लागू असलेल्या तत्वानुसार प्रकर्षाने असे स्पष्ट केले जाते की, एखाद्या कर्मचाऱ्याचे कुटूंब हे एक अविभाज्य सांख्यिक एकक असल्याने त्यास त्या कर्मचाऱ्याच्या वेतनावर व निवृत्तिविषयक लाभांवर हक्क सांगता येतो. कर्मचाऱ्याचे मातापिता हे अशा कुटूंब व्यवस्थेचे अविभाज्य घटक असतात; आणि



भाग पाच-१२१—१.
एचबी-२४९९—१.

ज्याअर्थी, जे कर्मचारी त्यांच्यावर अवलंबून असलेल्या मातापित्याकडे आणि दिव्यांग भाऊ-बहिणीकडे दुर्लक्ष करतात अशा कर्मचाऱ्यांपासून सुरुवात करुन त्यांच्यामध्ये, विशिष्ट अशा मानकांद्वारे एक प्रकारचा अनिवार्य सदाचार बिंबविण्यासाठी तरतूद करणे इष्ट आहे, जेणकरुन, असा प्रत्येक कर्मचारी हा त्या त्या समाजात एक आदर्श व्यक्ती म्हणून गणली जाईल; आणि

ज्याअर्थी, राज्य शासनाच्या किंवा महाराष्ट्र राज्यातील इतर कोणत्याही संघटनेच्या कर्मचाऱ्यांनी आपल्या मातापित्याचा व दिव्यांग भाऊ-बहिणीचा सांभाळ करावा याबद्दलच्या त्यांच्या उत्तरदायित्वाकरिता आणि त्यांच्याशी संबंधित व तद्नुषंगिक बाबींकरिता तरतूद करणे इष्ट आहे;

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे—

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ. १. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र कर्मचाऱ्यांची मातापित्याप्रती जबाबदारी आणि उत्तरदायित्व व देखभाल यासंबंधीच्या मानकांबाबत अधिनियम, २०२५ असे म्हणावे.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्रास लागू असेल.

(३) तो, राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल.

व्याख्या. २. या अधिनियमामध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, -

(क) " शासन" किंवा "राज्य शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे :

(ख) " नियम" याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेले नियम, असा आहे :

(ग) " अधिसूचना" याचा अर्थ, शासकीय राजपत्रात प्रसिध्द केलेली अधिसूचना असा आहे :

(घ) "अपील प्राधिकारी" याचा अर्थ, राज्य शासनाचा किंवा, यथास्थिति, संघटनेचा एखादा अधिकारी किंवा अंमलदार, किंवा अधिनियमान्वये तरतूद केल्याप्रमाणे पदनिर्देशित प्राधिकाऱ्याचा आदेशाविरुद्ध अपील दाखल करण्यासाठी, अधिनियमाच्या प्रयोजनार्थ राज्य शासनाच्या किंवा संघटनेच्या २५ आदेशाद्वारे कलम १३ अन्वये वेळोवेळी अधिसूचित करण्यात येईल असा पदनिर्देशित प्राधिकाऱ्याला दर्जाने व पदाने वरिष्ठ असलेला, असा अधिकारी किंवा कार्याधिकारी असा आहे;

(ड) "संविभाजन केलेले वेतन" याचा अर्थ, पदनिर्देशित प्राधिकाऱ्याने किंवा अपील प्राधिकाऱ्याने कर्मचाऱ्याच्या अवलंबी मातापित्याला/दिव्यांग भाऊ-बहिणीला त्या कर्मचाऱ्याच्या वेतनातून मंजूर केलेली रक्कम, असा आहे;

(च) "आयोग" याचा अर्थ, अधिनियमाच्या कलम १८ खाली घटित व अधिसूचित केलेला महाराष्ट्र कर्मचारी प्रणाम आयोग, किंवा असा आयोग अधिसूचित होईतोपर्यंत महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, असा आहे;

(छ) "अवलंबी दिव्यांग भाऊबहीण" याचा अर्थ, दिव्यांग व्यक्ती किंवा केंद्र सरकारने अधिसूचित केलेल्या दिव्यांग व्यक्तींच्या हक्काबाबत अधिनियम, २०१६ (२०१६ चा ४९) याच्या कलम २ (घ) आणि २ (न) अन्वये व्याख्या केल्याप्रमाणे "दिव्यांग असलेली व्यक्ती" किंवा अतिशय आधाराची गरज असणारी, आणि कर्मचाऱ्यांचे अविवाहित भाऊ किंवा बहीण (भावंड) असलेली आणि आपला उदरनिर्वाह चालविण्यासाठी स्वतःचे पुरेसे उत्पन्नाचे साधन नसलेली व्यक्ती, असा आहे;

(ज) "अवलंबी मातापिता" याचा अर्थ, स्वतःचे उत्पन्नाचे पुरेसे साधन नसलेल्या ज्या मातेला किंवा पित्याला किंवा दोन्हींना त्याच्या/तिच्या/त्यांच्या मुलावर/मुलीवर अवलंबून राहावे लागते, अशी माता किंवा पिता असा आहे;

(झ) "पदनिर्देशित प्राधिकारी" याचा अर्थ, राज्य शासनाच्या किंवा यथास्थिती, संघटनेचा अधिकारी किंवा कार्याधिकारी किंवा या प्रयोजनार्थ राज्य शासनाच्या किंवा संघटनेच्या अशा आदेशाद्वारे, असा अधिकारी म्हणून कलम ६ अन्वये वेळोवेळी अधिसूचित करण्यात येईल असा, आहरण व संवितरण प्राधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल, असा अधिकारी किंवा कार्याधिकारी असा आहे;

(त्र) "कर्मचारी" याचा अर्थ, राज्य शासनाने नियुक्त केलेली आणि तिच्या नियंत्रणाधीन असलेली आणि शासनाचा कोषागारामार्फत राज्याच्या एकत्रित निधीमधून आपले वेतन घेणारी किंवा कलम ३(२) अन्वये अधिसूचित करण्यात येईल त्याप्रमाणे, महाराष्ट्र राज्यात कार्यरत असलेल्या कोणत्याही संघटनेने नियुक्त केलेली कोणतीही व्यक्ती, असा आहे;

(ट) "संघटना" याचा अर्थ, महाराष्ट्र राज्यात कार्यरत असणारी आणि या अधिनियमामध्ये कक्षेत येणारी कलम ३(२) अन्वये राज्य शासनाने अधिसूचित केलेली संघटना असा आहे;

(ठ) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे;

(ड) "राज्यस्तरीय संनियंत्रण मंडळ" याचा अर्थ, या अधिनियमांच्या विविध तरतुदींचे पुनर्विलोकन व संनियंत्रण करण्यासाठी, कलम २५ (१) अन्वये घटित करावयाचे मंडळ, असा आहे;

(ढ) "कलम" याचा अर्थ, अधिनियमाचे कलम, असा आहेः

अधिनियमाच्या तरतुदी कर्मचाऱ्यांना लागू असणे.

**३.** (१) राज्य शासनाच्या सर्व कर्मचाऱ्यांना या अधिनियमाच्या तरतुदी लागू असतील.

(२) राज्य शासनास, या अधिनियमाखाली समाविष्ट करावयाच्या, महाराष्ट्र राज्यात कार्यरत असलेल्या संघटनांना अधिसूचित करील. अशा संघटनेच्या कर्मचाऱ्यांना या अधिनियमाच्या तरतुदीद्वारे आणि या अधिनियमाखाली विहित केलेले नियम लागू असतील.

अवलंबी मातापित्यांची/दिव्यांग भाऊ बहिणीची देखभाल व जबाबदारी.

**४.** (१) राज्य शासनाचा प्रत्येक कर्मचारी त्यांच्या माता-पित्याची/दिव्यांग भाऊ-बहिणीची देखभाल करण्यासाठी जबाबदार असेल आणि याबाबतीत कोणतेही दुर्लक्ष झाल्यास, ती बाब या अधिनियमाच्या तरतुदीखाली हाताळण्यात येईल.

(२) राज्य शासनाच्या किंवा संघटनेच्या कर्मचाऱ्यांच्या संबंधित वर्तणूक नियमांमध्ये, या अधिनियमाच्या जबाबदारी व प्रारंभाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत वरील बाबीचा समावेश करण्यासाठी सुधारणा करण्यात येईल.

संविभाजित वेतन मागण्यासाठी अवलंबी माता-पिता/दिव्यांग भाऊ बहिण यांनी अर्ज करणे.

**५.** (१) या अधिनियमाखाली कोणत्याही कर्मचाऱ्याचे, अवलंबी माता-पिता किंवा यथास्थिति, दिव्यांग भाऊ-बहिण यांपैकी दोन्हींना किंवा त्यापैकी कोणत्याही व्यक्तीस, आहरण व संवितरण अधिकाऱ्याने त्या कर्मचाऱ्याच्या वेतनामधून दरमहा (मासिक तत्वावर) त्यांना थेट द्यावयाच्या कर्मचाऱ्याच्या संविभाजित वेतनाची मागणी करणारा लेखी अर्ज कलम ६ खाली अधिसूचित केलेल्या पदनिर्देशित प्राधिकाऱ्याकडे करता येईल;

परंतु, अशा अवलंबी माता-पित्याने/दिव्यांग भाऊ-बहिणीने, त्यांची उपजीविका चालविण्यासाठी त्यांच्याकडे उत्पन्नाचे पुरेसे साधन नाही आणि त्यांना कर्मचाऱ्याकडून आर्थिक मदतीची गरज आहे, असे सिद्ध केले पाहिजे.

(२) अवलंबी माता-पित्याच्या/दिव्यांग भाऊ-बहिणीच्या अशा अर्जामध्ये, माता-पित्याच्या सर्व स्त्रोतामधील वैयक्तिक उत्पन्न आणि कर्मचाऱ्यांकडून त्यांना सध्या देण्यात येणारी आर्थिक मदत आणि अन्य स्वरुपाची मदत स्पष्टपणे नमूद करावी.

**६.** राज्य शासन किंवा, यथास्थिती, संघटना वेळोवेळी आदेशाद्वारे, कर्मचाऱ्याच्या संविभाजित केलेल्या पदनिर्देशित वेतनाची मागणी करणाऱ्या अवलंबी माता-पित्याकडून/दिव्यांग भाऊ-बहिणीकडून

प्राप्त झालेल्या अर्जावर विचार प्राधिकारी करण्याच्या प्रयोजनाकरिता, राज्य शासनाच्या किंवा, यथास्थिती, संघटनेच्या कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा नेमणूक कार्याधिकाऱ्यास पदनिर्देशित प्राधिकारी म्हणून अधिसूचित करील.

अर्ज निकाली काढण्याचा कालावधी.

**७.** अवलंबी माता-पित्याचा/दिव्यांग भाऊ-बहिणीचा अर्ज प्राप्त झाल्यावर पदनिर्देशित प्राधिकारी अशा दाव्याची पात्रता ठरवतील आणि त्या अर्जदाराला आणि संबंधित कर्मचाऱ्याला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, असा अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून जास्तीत जास्त ९० दिवसांच्या कालावधीच्या आत तो अर्ज निकालात काढेल.

संविभाजित केलेल्या वेतनाचे प्रमाण व कमाल मर्यादा.

**८.** पदनिर्देशित प्राधिकाऱ्यास उचित वाटल्यास, तो कलम ७ मध्ये नमूद केल्याप्रमाणे ९० दिवसांच्या कालावधीत, कर्मचाऱ्याच्या अवलंबी माता-पित्याच्या दिव्यांग भाऊ-बहिणीच्या अर्जासंदर्भात, कर्मचाऱ्याच्या वेतनाचे विभाजन करण्यास मंजुरी देईल आणि त्यासंदर्भातील आदेशाच्या दिनांकानंतरच्या महिन्यापासून अवलंबी. माता-पित्याना /दिव्यांग भाऊ-बहिणीना थेट मासिक तत्वावर द्यावयाची रक्कम संविभाजित करण्यात येईल असे स्पष्टपणे नमूद करून संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्याला तसे निदेश देईल,

परंतु, अशी संविभाजित केलेली रक्कम ही त्या कर्मचाऱ्याला प्रदान करण्यात येणाऱ्या एकूण मासिक वेतनाच्या २० टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही. तथापि, फक्त काही अपवादात्मक प्रकरणांमध्ये ती एकूण रक्कम मासिक वेतनाच्या २५ टक्क्यांपर्यंत जाऊ शकेल.

पदनिर्देशित प्राधिकारी अर्धन्यायिक प्राधिकारी असणे .

**९.** कलम ७ अन्वये पदनिर्देशित प्राधिकारी, अर्जाची सुनावणी करताना, अर्धन्यायिक अधिकारांचा वापर करतील.

अर्ज फेटाळणे.

**१०.** या अधिनियमाच्या व त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदीन्वये ते प्रकरण विचारात घेतले जाण्यासाठी योग्य वाटले नाही तर, पदनिर्देशित प्राधिकाऱ्यास ९० दिवसांच्या विनिर्दिष्ट कालावधीच्या आत, अर्ज फेटाळण्याबद्दलची तर्कसंगत कारणे नमूद असलेला, लेखी स्वरुपातील आदेश सर्व सबंधितांना रितसर सूचित करून त्याद्वारे अर्ज फेटाळता येईल.

अपील करण्याचा अधिकार.

**११.** पदनिर्देशित प्राधिकाऱ्याने ९० दिवसांच्या विनिर्दिष्ट कालावधीच्या आत, ते प्रकरण निकालात काढले नाही तर, अवलंबी माता-पिता, दिव्यांग भाऊ-बहीण किंवा कर्मचारी यांना, विहीत करण्यात येईल अशा २० कार्यपध्दतीनुसार अपील प्राधिकाऱ्यासमोर अपील करण्याचा अधिकार असेल.

पदनिर्देशित प्राधिकाऱ्याच्या आदेशाविरुध्द अपील करण्याचा अधिकार .

**१२.** पदनिर्देशित प्राधिका-याच्या आदेशामुळे व्यथित झालेले अवलंबी माता-पिता यथास्थिती, पाच्या दिव्यांग प्राधिकाऱ्याच्या भाऊ-बहीण किंवा कर्मचारी यांना पदनिर्देशित प्राधिका-याच्या आदेशाविरुध्द असा आदेश मिळाल्याच्या आदेशाविरुध्द दिनांकापासून एक महिन्याच्या आत अपील प्राधिकाऱ्यासमोर अपील दाखल करता येईल.

अपील प्राधिकारी यांची नेमणूक.

**१३.** संविभाजित वेतन मागणारा अर्ज निकालात काढणाऱ्या पदनिर्देशित प्राधिकाऱ्याच्या आदेशांविरुध्दचे यांची नेमणूक अपील अर्ज विचारात घेण्यासाठी राज्य शासन किंवा यथास्थिती संघटना, आदेशाद्वारे, राज्य शासनाच्या किंवा यथास्थिती, संघटनेच्या अधिकाऱ्यास किंवा पदाधिकाऱ्यास अपील प्राधिकारी म्हणून अधिसूचित करील.

अपील प्राधिकाऱ्यास.

**१४.** अपील प्राधिकारी कलम १३ अन्वये दाखल केलेल्या अपिलावर, त्यातील दोन्ही पक्षकारांना बस आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देऊन, सुनावणी करेल आणि त्यास आवश्यक वाटेल असा आदेश देईल.

अपील निकालात काढण्यासाठी कालमर्यादा.

**१५.** व्यथित झालेले अवलंबी माता पिता/दिव्यांग भाऊ-बहीण किंवा कर्मचारी यांच्याकडून अपील काढण्यासाठी प्राप्त झाल्यावर, अपील प्राधिकारी असा अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ठी ६० दिवसांपेक्षा अधिक असणार कालमर्यादा. नाही इतक्या कालावधीच्या आत त्या अपिलावर निर्णय देईल.

**१६.** अपिलाच्या सुनावणीनंतर अपील प्राधिकाऱ्यांस ते अपील योग्य वाटल्यास, आपल्या आदेशात अपील निश्चित करील अशी संविभाजित रक्कम त्या कर्मचाऱ्याच्या वेतनातून त्यांच्या अवलंबी माता-पित्यांना, दिव्यांग भाऊ-बहिणीला आदेशाच्या दिनांकाच्या लगतनंतरच्या महिन्यापासून मंजूर करण्याचा लेखी आदेश पदनिर्देशित प्राधिकाऱ्याला देईल, अपील प्राधिकरणाचे आदेश.

परंतु, अशी मंजूर करण्यात आलेली संविभाजित रक्कम ही, त्या कर्मचाऱ्याला प्रदान करण्यात येणाऱ्या एकूण मासिक वेतनाच्या २० टक्क्यापेक्षा अधिक असणार नाही. तथापि, फक्त काही अपवादात्मक प्रकरणांत ती रक्कम एकूण मासिक वेतनाच्या २५ टक्क्यापर्यंत जाऊ शकेल.

**१७.** या अधिनियमाच्या आणि त्याखाली तयार केलेल्या नियमांच्या तरतुदीनुसार अपील विचारात घेण्यासाठी योग्य नाही, अशी अपील प्राधिकाऱ्याची खात्री पटली असेल तर त्या अपील प्राधिकाऱ्यास अर्ज फेटाळण्याबद्दलची तर्कसगत कारणे नमूद असलेला लेखी स्वरुपातील आदेश ६० दिवसांच्या विनिर्दिष्ट कालावधीच्या आत सर्व संबंधितांना रीतसर सूचित करून त्याद्वारे अपील फेटाळता येईल. अपील प्राधिकाऱ्याने अपील फेटाळणे.

**१८.** (१) राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, त्याबाबतीत प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि या अधिनियमान्वये नेमून दिलेली कार्य पार पाडण्यासाठी महाराष्ट्र राज्य कर्मचारी प्रणाम आयोग या नावाने ओळखला जाणारा एक निकाय गठित करील. महाराष्ट्र राज्य कर्मचारी प्रमाण आयोग गठीत करणे.

(२) असा आयोग घटित करण्यात येईपर्यंत महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, राज्य शासनाकडून, याबाबतीत राजपत्रात अधिसूचित करण्यात येईल आणि अशा दिनांकापासून या अधिनियमाखाली आयोगाच्या अधिकारांचा वापर करेल आणि कार्य पार पाडेल.

(३) महाराष्ट्र राज्य कर्मचारी प्रणाम आयोग हा पुढील व्यक्ती मिळून बनलेला असेल,

(क) मुख्य आयुक्त, आणि

(ख) आवश्यक वाटेल त्याप्रमाणे, दोन पेक्षा अधिक नसतील इतके आयुक्त.

(४) राज्य शासन, वेळोवेळी, अधिसूचनेद्वारे, अनुक्रमे पोट-कलमे (६) व (७) यामध्ये नमूद केलेली अर्हता व अनुभव धारण करणाऱ्या व्यक्तीमधून मुख्य आयुक्त व आयुक्त यांची नियुक्ती करील.

(५) आयोगाच्या कामकाजाचे सर्वसाधारण अधीक्षण, संचालन व व्यवस्थापन हे, मुख्य आयुक्ताकडे निहित असेल, मुख्य आयुक्त यांना आयुक्त सहाय्य करतील आणि त्यांना या अधिनियमाखालील इतर कोणत्याही प्राधिकरणाद्वारे देण्यात येणाऱ्या निर्देशांना अधीन न राहता, आयोगाद्वारे वापरण्यात येतील अशा सर्व अधिकारांचा स्वायत्तपणे वापर करता येईल आणि आयोगाद्वारे सर्व कार्य पार पाडता येईल.

(६) मुख्य आयुक्त यांची राज्य शासनामध्ये अपर मुख्य सचिवाच्या दर्जापेक्षा कमी नाही अशा दर्जाच्या पदावर काम केलेले असेल अशा व्यक्तींमधून नियुक्त करण्यात येईल.

(७) आयुक्त हे कायदा, समाजसेवा, प्रशासन व शासन व्यवहार यांमधील विस्तृत ज्ञान व अनुभव धारण केलेली आणि राज्य शासनाच्या आयुक्त पदावर किंवा शासनामध्ये काम केलेली अशी व्यक्ती असेल.

(८) राज्यात आयोगाचे मुख्यालय हे राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा ठिकाणी असेल.

परंतु आयोगास, राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेने राज्यातील अन्य एका किंवा अनेक ठिकाणी, कार्यालय किंवा कार्यालये स्थापन करता येतील.

**१९.** (१) मुख्य आयुक्त हा, ज्या दिनांकास त्याने आपले पद ग्रहण केले, दिनांकापासून पाच वर्षांच्या मुदती करिता पद धारण करील. मुख्य आयुक्त व आयुक्त यांचा पदावधी व सेवेच्या शर्ती.

परंतु कोणताही मुख्य आयुक्त त्यांची वयाची पासष्ट वर्षे पुर्ण झाल्यावर असे पद धारण करणार नाही.

(२) प्रत्येक आयुक्त हा, ज्या दिनांकास त्याने आपले पद ग्रहण केले असेल त्या दिनांकापासून पाच वर्षांच्या मुदतीकरिता किंवा त्याच्या वयाची पासष्ट वर्षे पूर्ण होईपर्यंत, यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत पद धारण करील.

परंतु, ज्याच्या वयाची पासष्ट वर्षे पुर्ण झालेली नाहीत असा प्रत्येक आयुक्त हा, या पोट कलमान्वये त्याचे पद रिक्त झाल्यावर, मुख्य आयुक्त म्हणून नियुक्ती केला जाण्यासाठी पात्र असेल.

परंतु आणखी असे की, आयुक्त हा, मुख्य आयुक्त म्हणून नियुक्त करण्यात आला असेल त्याबाबतीत त्याचा आयुक्त व मुख्य आयुक्त म्हणून असलेला एकूण पदावधी हा पाच वर्षांपेक्षा अधिक असणार नाही.

(३) मुख्य आयुक्तास किंवा आयुक्तास, कोणत्याही वेळी राज्य शासनाला उद्देशून आपल्या पदाचा आपल्या स्वाक्षरीनिशी लेखी राजीनामा देता येईल.

परंतु मुख्य आयुक्ताला किंवा आयुक्ताला, कलम २० अन्वये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या रितीने, त्याच्या पदावरुन दूर करता येईल.

(४) मुख्य आयुक्ताला आणि आयुक्ताला देय असलेले वेतन व भत्ते आणि त्यांच्या सेवेच्या इतर अटी व शर्ती ,

(क) मुख्य आयुक्ताच्या बाबतीत, राज्य शासनाच्या अपर मुख्य सचिवाच्या दर्जाच्या किंवा त्यापेक्षा कमी नसेल अशा दर्जाच्या पदाला जे वेतन, भत्ते आणि सेवेच्या अटी व शर्ती लागू असतील, त्याप्रमाणेच असतील.

(ख) आयुक्तांच्या बाबतीत, राज्य शासनाच्या आयुक्तांच्या आणि सचिवाच्या दर्जाच्या किंवा त्यापेक्षा कमी नसेल अशा दर्जाच्या पदाला जे वेतन व भत्ते आणि सेवेच्या अटी व शर्ती लागू असतील त्याप्रमाणेच असतील.

परंतु, जर मुख्य आयुक्त किंवा आयुक्त यांच्या नियुक्तीच्या वेळी, केंद्र सरकारच्या किंवा राज्य शासनाच्या आधी केलेल्या कोणत्याही सेवेच्या संदर्भात, विकलांगता किंवा जखम व इजा निवृत्तीवेतना व्यतिरिक्त इतर कोणतेही सेवा निवृत्तीवेतन होत असेल तर, अशा मुख्य आयुक्त किंवा आयुक्त पदावरील सेवेच्या संदर्भात देय असलेल्या त्याच्या वेतनातून सेवानिवृत्ती उपदानाएवढी सेवानिवृत्ती वेतनाची रक्कम वगळता, सेवानिवृत्तीवेतनाची जी रक्कम अंशराशीकृत केली होती अशी सेवानिवृत्तीवेतनाची कोणतीही रक्कम आणि सेवानिवृत्तीच्या इतर स्वरुपाच्या लाभांएवढी निवृत्तीवेतनाची रक्कम वजा करण्यात येईलः

परंतु, आणखी असे की, मुख्य आयुक्त किंवा आयुक्त जर त्याच्या नियुक्तीच्या वेळी, कोणत्याही केंद्रीय अधिनियमाद्वारे किंवा राज्य अधिनियमाद्वारे किंवा त्यान्वये स्थापन करण्यात आलेल्या कोणत्याही निगम निकाया मध्ये किंवा केंद्र सरकारच्या किंवा राज्य शासनाच्या मालकीच्या किंवा त्यांचे नियंत्रण असलेल्या कोणत्याही कंपनीमध्ये आधीच्या केलेल्या कोणत्याही सेवेच्या संबंधात सेवानिवृत्तीचे लाभ घेत असेल तर, मुख्य आयुक्त किंवा आयुक्त पदावरील सेवेच्या संबंधात देय असलेल्या त्याच्या वेतनातून सेवा निवृत्तीच्या लाभांएवढी निवृत्ती वेतनाची रक्कम वजा करण्यात येईलः

परंतु तसेच, मुख्य आयुक्त आणि आयुक्त यांचे वेतन, भत्ते व सेवेच्या इतर शर्ती यांमध्ये, त्यांच्या नियुक्तीनंतर त्यांचे नुकसान होतील असे कोणतेही बदल करण्यात येणार नाहीत.

मुख्य आयुक्त किंवा आयुक्तास पदावरुन दूर करणे.

**२०.** या कलमात केलेल्या तरतुदीस अधीन राहून, राज्य शासनास, आदेशाद्वारे मुख्य आयुक्तास किंवा आयुक्तास पुढील कारणास्तव त्यांच्या पदावरून दूर करता येईल-

(क) नादार म्हणून अभिनिषित करण्यात आलेला असेल, किंवा

(ख) राज्य शासनाच्या मते नैतिक अधःपनाचा अंतर्भाव असणाऱ्या एखादा अपराधाबद्दल त्याला दोषी ठरवण्यात आले असेल, किंवा,

(ग) तो, त्याच्या पदावधीच्या काळात, त्याच्या पदाच्या बाहेरील कोणतेही वेतन मिळणारे काम करत असेल, किंवा

(घ) राज्य शासनाच्या मते, मानसिक किंवा शारीरिक दुर्बलतेमुळे त्याला त्याच्या पदावर पुढे काम करण्यासाठी असमर्थ ठरविले असेल, किंवा

(ड) तो, मुख्य आयुक्त म्हणून किंवा, जर त्याच्या कार्यावर बाधक परिणाम होण्याचा संभव असेल अशाप्रकारचे आर्थिक किंवा अन्य हितसंबंध त्याने संपादित केले असेल, किंवा

(च) राज्य शासनास उचित आणि योग्य वाटेल असे इतर कोणतेही कारण असेल.

आयोगाचे अधिकार व कर्तव्ये.

**२१.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहून, पुढील कर्मचाऱ्याचे माता-पिता/दिव्यांग भाऊ बहीण यांच्याकडून तक्रार स्वीकारणे व त्या तक्रारीवर चौकशी करणे हे आयोगाचे कर्तव्य असेल,

(क) या अधिनियमाखाली एखादा अधिकारी नियुक्त केलेला नसेल किंवा कार्य करत नसेल किंवा पदनिर्देशित अधिकाऱ्याने किंवा यथास्थिति, अपील प्राधिकाऱ्याने या अधिनियमाखाली त्याचा किंवा तिचा अर्ज किंवा अपील स्वीकारण्यासाठी नकार दिला या कारणावरून, जे पदनिर्देशित अधिकारी किंवा यथास्थिति, अपील प्राधिकारी यांच्या समोर अर्ज किंवा अपील सादर करण्यास असमर्थ ठरला असेल,

(ख) या अधिनियमान्वये विनिर्दिष्ट केलेल्या कालमर्यादेत कर्मचाऱ्याच्या संविभाजित वेतन मंजुरीच्या आदेशास प्रतिसाद देण्यात आलेला नसेल.

(२) पोट-कलम (१) अन्वये तक्रार मिळाल्यानंतर, आयुक्त, त्या प्रकरणात चौकशी करण्यासाठी वाजवी कारणे आहेत, या गोष्टीची खात्री करेल आणि त्यानंतर चौकशीस प्रारंभ करेल.

(३) आयोगास, या कलमाखाली कोणत्याही प्रकरणाची चौकशी करतेवेळी, पुढील बाबींच्या संबंधात, एखाद्या दाव्याची न्यायचौकशी करताना दिवाणी न्यायालयाला, दिवाणी प्रक्रिया संहिता, (१९०८ चा ५) या अन्वये जे अधिकार विहित केलेले असतील, तेच अधिकार असतील,

(क) व्यक्तींना समन्स पाठविणे आणि उपस्थित राहण्यास सांगणे आणि तोंडी किंवा लेखी साक्षीपुरावा देण्यास भाग पाडणे आणि दस्तऐवज किंवा वस्तू सादर करण्यास सांगणे,

(ख) दस्तऐवजांचा शोध घेण्यास व ते सादर करण्यास,

(ग) शपथपत्रांवर पुरावा स्वीकारणे,

(घ) कोणत्याही न्यायालयाकडून किंवा कार्यालयाकडून कोणताही शासकीय अभिलेख किंवा त्याच्या प्रती मागविणे;

(ङ) साक्षीदारांची किंवा दस्तऐवजांची आणि विहित करण्यात येईल अशी इतर कोणतीही बाब तपासणी करण्यासाठी आयोगपत्र काढणे :

(४) त्या त्या वेळी अंमलात असणाऱ्या इतर कोणत्याही कायद्यामध्ये एत्दविरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, आयोगास, या अधिनियमान्वये कोणत्याही तक्रारीवर चौकशी करतेवळी, प्राधिकरणाच्या नियंत्रणखाली असेल अशा ज्या कोणत्याही अभिलेखास हा अधिनियम लागू होतो अशा कोणत्याही अभिलेख्याची तपासणी करता येईल.

आयोगाच्या समोरील दुसरे अपील.

**२२.** कलम १५ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालमर्यादेत अपीलाचा निर्णय प्राधिकाऱ्याकडून मिळालेला नसेल तर, असे अवलंबित माता-पिता/दिव्यांग भाऊ-बहीण किंवा अपील प्राधिकाऱ्याच्या निर्णयाने व्यथित झालेला कोणताही कर्मचारी किंवा माता-पिता/दिव्यांग भाऊ-बहीण यास यथास्थिती असा कालावधी समाप्त होण्याच्या दिनांकापासून अपील प्राधिकाऱ्याचा असा निर्णय मिळाल्याच्या दिनांकापासून ६० दिवसांच्या आत, आयोगापुढे अपील दाखल करता येईल.

परंतु, अपील करणाऱ्यांस, अपील वेळेत दाखल करण्यापासून प्रतिबंध करण्याकरिता वाजवी कारण असेल अशो आयोगाची खात्री पटल्यास, आयोगास ६० दिवसांचा कालावधी समाप्त झाल्यांनतरही अपील दाखल करून घेता येईल.

(२) या कलमाखालील अपील, ते मिळाल्याच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत किंवा यथास्थिती ते दाखल केल्याच्या दिनांकापासून एकूण १२० दिवसांपेक्षा अधिक नसेल अशा वाढवून दिलेल्या कालावधीच्या आत, त्याबाबतच्या कारणांची लेखी नोंद करून आयोगास अपील निकालात काढता येईल.

(३) आयोगाचा निर्णय, यथास्थिती, अंतिम असेल आणि सर्व संबंधितांवर बंधनकारक असेल

(४) पोट-कलम (३) च्या निर्णयान्वये, आयोगाला, पुढील बाबींचा अधिकार असेल,

(क) पदनिर्देशित अधिकाऱ्यास किंवा अपील अधिकाऱ्यास या अधिनियमाच्या तरतुदींचे अनुपालन करण्यासाठी आवश्यक वाटतील अशी कोणतेही पावले उचलण्यास आणि या अधिनियमान्वये तरतूद केलेली कोणतीही शास्ती लादण्यास अधिकार असेल,

(ख) कर्मचाऱ्यांच्या एकूण वेतनाच्या १०% पेक्षा अधिक नसेल इतकी कर्मचाऱ्याच्या वेतनातील संविभाजित रक्कम अवलंबून असलेले माता-पिता/दिव्यांग भाऊ-बहीण यांना प्रदान करण्यात येईल. अपवादात्मक परिस्थितीत ती रक्कम एकूण मासिक वेतनाच्या १५% पेक्षा अधिक होत असल्यास, पदनिर्देशित अधिकाऱ्यांच्या निर्देशासह, आहरण व संवितरण अधिकाऱ्यांमार्फत, पुढील महिन्यापासून अनुदानग्रहीत थेट संविभाजित वेतनाच्या प्रदानाची रक्कम मंजूर करण्याचा व तसे प्रदान करण्याची व्यवस्था करण्याचा आदेश देईल;

(ग) तर्कसंगत कारणासह अपील, लेखी नोंद करून फेटाळणे आणि सर्व संबंधितांना ते कळिवणे,

(घ) योग्य आणि उचित असतील, परंतु या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील, असे इतर कोणतेही आदेश,

(१) आयोग, त्याच्या निर्णयाची नोटीस, अपीलाच्या कोणत्याही अधिकारासह, तक्रारदार आणि पदनिर्देशित अधिकारी, यांना देईल.

(२) आयोग, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांनुसार विहित करण्यात येईल, अशा कार्यपध्दतीनुसार अपीलावर निर्णय देईल.

शास्ती.

**२३.** एखाद्या तक्रारीवर किंवा अपीलावर निर्णय देते वेळी आयोगाचे जर असे मत असेल की, पदनिर्देशित प्राधिकारी किंवा यथास्थिती, अपील प्राधिकारी यांनी कोणत्याही वाजवी कारणाशिवाय अर्ज स्वीकारण्यास नकार दिला किंवा कलम ७ आणि कलम १५ खाली विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत अर्ज निकालात काढला नसल्यास, अशा पदनिर्देशित प्राधिकारी किंवा यथास्थिती, अपील प्राधिकारी याच्यावर, अर्ज निकालात काढण्यात येईपर्यंत, प्रति दिन शंभर रुपये अशी शास्ती लादण्यात येईल आणि अशा शास्तीची एकूण रक्कम पंचवीस हजार रुपयांपेक्षा अधिक असणार नाही.

अपील मागे घेण्याचा अधिकार.

**२४.** (१) हा अधिनियम व त्याखाली केलेले नियम यामध्ये काहीही अंतभूत असले तरी, अवलंबी माता-पिता/दिव्यांग भाऊ-बहीण यांना आयोगाच्या पदनिर्देशित अधिकारी किंवा अपील प्राधिकारी यांच्या अधिकार, समोरील, त्यांचा संविभाजनाचा आदेश देण्यापुर्वी किंवा आदेशाची सुनावणी करतेवेळी किंवा आदेश मंजूर केल्यानंतर, किंवा त्यांना संविभाजित वेतन प्रदान सुरु असताना कोणत्याही टप्प्यावर, त्यांचा अर्ज, अपील किंवा संविभाजनाचा आदेश विखंडीत करण्याचा हेतू असलेले अपील मागे घेता येईल;

परंतु, अवलंबी असलेले माता-पिता / दिव्यांग भाऊ-बहीण यांस, -

(क) पदनिर्देशित प्राधिकारी, अपील प्राधिकारी किंवा यथास्थिती, आयोग यांना तो अर्ज

किंवा अपील किंवा यथास्थिती, संविभाजनाचा आदेश रद्द करण्याचा अर्ज मागे घेण्यासाठी प्रस्तावित करण्याची कारणे व बदललेली परिस्थिती, स्पष्टपणे नमूद करून तशा आशयाचा अर्ज लेखी देता येईल,

(ख) अवलंबी माता-पिता/दिव्यांग भाऊ-बहीण यांनी स्वतःच्या निर्णयाने विनंती करण्यात येत आहे आणि कुठूनही कोणतीही बळजबरी करण्यात आलेली नाही असे अभिवेदन देतील,

(ग) ज्या महिन्यापासून अशा संविभाजित वेतनाचा आदेश मागे घेण्यात आला असेल तो महिना नमूद करतील.

(२) आयुक्त, अपील प्राधिकारी यांच्याकडून असा अर्ज मान्य करण्यात आल्यानंतर, ते, पदनिर्देशित अधिकाऱ्यास, अशा आदेशाच्या पुढच्या महिन्यापासून अनुदानग्रही माता-पिता / भाऊ-बहीण यांचे संविभाजित वेतन खंडीत करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना निदेश देणारा एक औपचारिक आदेश देण्याचा निर्देश देतील आणि असा अर्ज पदनिर्देशित प्राधिकाऱ्यासमोर दाखल करण्यात आला असल्यास, तो ही याखाली तरतूद केल्याप्रमाणे असेल.

(३) अनुदानग्रही माता-पिता/दिव्यांग भाऊ-बहीण यांचा मृत्यू किंवा अनुदानग्रही माता-पिता /भाऊ-बहिण यांना उत्पन्नाचे एखादे नवीन साधन निर्माण होणे यासारखी परिस्थिती उद्‌भवल्यास कर्मचारी, पदनिर्देशित अधिकाऱ्याकडे तशा आशयाचा एक अर्ज सादर करतील आणि त्यानंतर कर्मचाऱ्याने त्याच्यासमोर सादर केलेल्या साक्षीपुराव्यावर विचार करून आणि ज्याच्या संबंधात उत्पन्नाचे नवीन साधन निर्माण झालेले आहे अशा उत्पनाच्या साधनाबाबत अनुदानग्रही माता-पिता/दिव्यांग भाऊ-बहीण यांची सुनावणी झाल्यानंतर अशा अर्जाच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत तो निकालात काढण्यात येईल.

(४) पदनिर्देशित अधिकाऱ्याने विनिर्दिष्ट कालावधीत अर्ज निकालात काढण्यास कसूर केल्यास, कर्मचाऱ्याला अपील प्राधिकाऱ्याकडे अपील दाखल करता येईल आणि त्यानंतर आयोग या अधिनियमात तरतूद केलेल्या रीतीने अपील निकालात काढेल.

**२५.** (१) राज्यशासनास, अधिसूचनेद्वारे रुग्ण आणि आश्रित वृध्द-पालक/दिव्यांग भाऊबहीण यांच्या हालअपेष्टा कमी करण्याकरिता या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करून काटेकोर संनियंत्रण करण्यासाठी राज्यस्तरावर एक संनियंत्रण मंडळ घटित करता येईल. राज्यस्तरीस संनियंत्रण मंडळ.

(२) पोट-कलम (१) अन्वये घटित करण्यात आलेले मंडळ कर्मचाऱ्यांमध्ये मूलभूत नैतिकता आणि कौटुंबिक मुल्याचे बळकटीकरण करण्याकरिता तसेच त्याद्वारे शासकीय कर्मचाऱ्याबरोबर समाजामध्येही मोठ्या प्रमाणात अशा मुल्यांना अधिकाधिक चालना देण्याकरिता विस्तृत आणि अधिकाधिक प्रयत्न करेल.

**२६.** या अधिनियमाच्या तरतुदीची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, आदेशाद्वारे, ती अडचण दूर करण्यासाठी त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशा, या अधिनियमाच्या करण्याचा किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदी करता येतील. अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**२७.** या अधिनियमाखाली केलेल्या नियमांनुसार सद्‌भावना केलेल्या किंवा करण्याचे योजिलेल्या कोणत्याही कृतीबदल राज्यशासन किंवा संघटना किंवा कोणतेही प्राधिकरण किंवा कोणताही कार्याधिकारी किंवा त्याचा कोणताही अधिकारी किंवा कोणताही व्यक्ती यांच्या विरुध्द कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर संरक्षण, कार्यवाही दाखल करता येणार नाही. सद्‌भावपूर्वक केलेल्या कृतीस संरक्षण.

**२८.** कोणतेही न्यायालय या अधिनियमाअन्वये दिलेल्या कोणत्याही आदेशाच्या संबंधातील कोणताही न्यायालयाच्या दावा, अर्ज किंवा इतर कार्यवाही विचारार्थ दाखल करून घेणार नाही आणि अशा कोणत्याही आदेशास, या अधिकारतेस रोध, अपिलाखेरीज अन्यथा प्रश्नास्पद करण्यात येणार नाही.

**२९.** (१) राज्य शासन, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्यासाठी शासकीय राजपत्रात नियम करण्याचा अधिकार. अगोदर प्रकाशित करण्याच्या शर्तीच्या अधीन राहून नियम करेल. नियम करण्याचा अधिकार.

(२) अधिकाराच्या सर्वसाधारणतेला बाध न पोहचविता, अशा नियमांमध्ये या अधिनियमाच्या अंमलबजावणीमध्ये अंतर्भूत असलेल्या विविध प्राधिकाऱ्याकडून अनुसरण्यात येणाऱ्या कार्यपध्दतीसह सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईल.

(३) ह्या अधिनियमाद्वारे करण्यात आलेल्या प्रत्येक नियम, तो तयार करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्यांच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे संमत होतील किंवा नियम करू नये म्हणनू दोन्ही सभागृहे निर्णय घेतील तर, असा निर्णय शासकीय राजपत्रात अधिसूचना प्रसिध्द केल्याच तारखेपासून असा फेरबदल केलेल्या स्वरुपात तो नियम अंमलात येईल किंवा यथास्थिती येणार नाही. तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करावयाचे राहिलेल्या कोणत्या गोष्टीच्या वैधतेस बाधा येणार नाही.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

मातृदेवो भव, पितृदेवो भव असे आपण म्हणतो मात्र प्रत्यक्षात आई वडिलांना वृद्धापकाळात हालअपेष्टा सहन कराव्या लागतात. अनेक शासकीय अधिकारी व कर्मचारी आईवडीलांचे पालन-पोषण न करता त्यांची जबाबदारी झटकुन मोकळे होतात. त्यांची जबाबदारी घेण्यास ते तयार नसतात. हेच त्यांच्या दिव्यांग भाऊ बहिणीबाबत देखील घडताना आपण बघतो. अशावेळी ही जबाबदारी निश्चीत करण्यासाठी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वेतनातील २० टक्के रक्कम आई वडिलांच्या बैंक खात्यात जमा करण्याची तरतूद करणे तसेच माता पित्यांच्या व दिव्यांग भावा बहिणींची जबाबदारी योग्य पद्धतीने पार पडण्यासाठी इतर तरतूदी करणे आवश्यक आहे.

या अधिनियमान्वये प्रत्येक कर्मचाऱ्याचे माता-पिता, ज्येष्ठ नागरिक तसेच त्यांचे दिव्यांग भाऊ-बहीण यांच्या मासिक उदरनिर्वाहाचा दावा कमी खर्चात व त्वरीत करण्याची तरतूद आहे. तसेच प्रत्येक कर्मचाऱ्यांवर त्यांच्या माता-पित्यांची, दिव्यांग भाऊ-बहिणींच्या निर्वाहाची जबाबदारी देण्यात आली आहे. या अधिनियमाचे मुख्य वैशिष्ट म्हणजे राज्य शासनाच्या किंवा इतर कोणत्याही संघटनेच्या कर्मचाऱ्यांनी आपल्या माता-पित्याचा व दिव्यांग भाऊ-बहिणींचा सांभाळ तसेच त्यांचे उत्तरदायित्व करण्याची तरतूद आहे.

वरील उद्दिष्टे साध्य करणे हा या विधेयकाचा हेतु आहे.

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : १७ नोव्हेंबर,२०२५.

**सुधीर मुनगंटीवार,**
प्रभारी सदस्य.

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन

या विधेयकात, वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहेत :—

खंड १८ (१) या खंडान्वये, अधिसूचनेद्वारे याबाबतीत नियत करील अशा दिनांकापासून या अधिनियमाच्या प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि या अधिनियमान्वये नेमून दिलेली कार्ये पार पाडण्यासाठी महाराष्ट्र राज्य कर्मचारी प्रणाम आयोग स्थापना करण्याचा तसेच उक्त आयोग स्थापन होईपर्यंत संबंधित काम पार पाडण्यासाठी महाराष्ट्र प्रशासकीय प्राधिकरण उक्त आयोगाच्या अधिकांराचा वापर करण्यासंदर्भात अधिसूचना काढण्याचा आणि आयोगाचे मुख्यालय ठरविण्याचे अधिकार राज्य शासनाकडे घेण्यात आले आहेत.

खंड २० या खंडान्वये मुख्य आयुक्त किंवा आयुक्तास पदावरुन दूर करण्याचा अधिकार राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

खंड २५ (१) चा खंडान्वये या अधिनियमाच्या तरतूदींची अंमलबजावणी करुन काटेकोर संनियंत्रण करण्यासठी राज्यस्तरावर संनियत्रण मंडळ घटीत करण्याचा अधिकार राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

खंड २६ या खंडान्वये प्रस्तुत अधिनियमातील तरतूदींच्या अंमलबजावणी संदर्भात उद्‌भवलेल्या अडचणी आदेशान्वये दूर करण्याचा अधिकार राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

खंड २९ या खंडान्वये, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करण्याचे अधिकार व उक्त केलेले नियम विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्याचा अधिकार राज्यशासनाकडे घेण्यात आला आहे.

**वैधानिक अधिकार सोपविण्यासंदर्भाचे उपरोल्लेखीत प्रस्ताव सामान्य स्वरुपाचे आहेत.**

**वित्तीय ज्ञापन**

विधेयकाच्या कलम १८ अन्वये महाराष्ट्र राज्य कर्मचारी प्रणाम आयोगावर मुख्य आयुक्त व दोन पेक्षा अधिक नसतील इतके आयुक्त यांची नियुक्ती करण्याची व कलम १९ अन्वये त्यांच्या वेतन व भत्त्यांची आणि आयोगाच्या मुख्यालयाबाबत व जिल्हा कार्यालयांबाबत तरतूद करण्यात आली आहे.

हे विधेयक राज्य विधानमंडळाचा अधिनियम म्हणून अधिनियमित झाल्यावर, वर नमूद केलेल्या प्रयोजनांसाठी राज्याच्या एकत्रित निधीमधून करावयाच्या आवर्ती खर्चाचा अंतर्भाव असेल. तथापि, याबाबत कराव्या लागणाऱ्या प्रत्यक्ष आवर्ती खर्चाचा अंदाज देणे या टप्प्यावर शक्य नाही.

**विधान भवन,**
नागपूर,
दिनांक : १२ डिसेंबर, २०२५.

**जितेंद्र भोळे,**
सचिव-१
महाराष्ट्र विधानसभा.

भाग पाच-१२१–३.
एचबी-२४९९–३.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.